वर्ष- ११ | अंक- ३१ | मुंबई, मंगळवार, १७ जून ते २३ जून २०२५ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 पायांमध्ये हे ४ बदल कोलेस्ट्रॉल वढल्याचे देतात संकेत

3 → विमान दुर्घटना भयावह; कशामुळे नि कोणामुळे?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार ३ टप्प्यात ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# अहमदाबाद विमानाचा व्हिडिओ शूट करणारा आर्यन पोलिसांच्या ताब्यात; घराबाहेर माध्यम प्रतिनिधींच्या रांगा



**मुंबई:** अहमदाबादमधील एअर इंडियाच्या विमान दुर्घटनेचा थरारक प्रसंग एका व्हिडिओच्या माध्यमातून घराघरात आणि प्रत्येकापर्यंत पोहोचला. अहमदाबाद विमान दुर्घटनेनं देशभरात शोककळा पसरली होती. अवघ्या काही मिनिटांत होत्याचं नव्हतं करणारा हा अपघात पाहून अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. तर, विमान अपघातातील मृतांच्या नातेवाईकांचा आक्रोश बघून कित्येकांचे डोळे पाणावले. या विमान दुर्घटनेत 241 प्रवाशांसह एकूण 275 नागरिकांचा मृत्यू झाला असून सध्या विमान अपघाताचा तपास करण्यात येत आहे. एअर इंडियांचे बोईंग 171 हे प्रवासी विमान 12 जून रोजी दुपारी 1.38 वाजता कोसळल्याची दुर्घटना घडली. त्यानंतर, काही वेळातच विमान दुर्घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. विशेष म्हणजे कधीही जवळून विमान न पाहणाऱ्या एका गावातील मुलाने हा व्हिडिओ उत्सुकतेपोटी शूट केला होता. मात्र, नेमकं विमानाचे उड्डाण शूट करताना हा भीषण अपघात घडला. आता, पोलिसांनी व्हिडिओ शूट करणाऱ्या आर्यनला चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. अहमदाबादमधील एअर इंडियाच्या विमान दुर्घटनेचा थरारक प्रसंग एका व्हिडिओच्या माध्यमातून घराघरात आणि प्रत्येकापर्यंत पोहोचला. अपघातग्रस्त एआय 171 या विमानाने उड्डाण केल्यावरचा अवघा काही सेकंदाचा हा व्हिडीओ आहे. या व्हिडीओत उड्डाणानंतर विमान खाली कोसळताना दिसून येते. या व्हिडीओमुळेच जगभरात काही क्षणात दुर्घटनेची माहिती मिळाली, त्यानंतर अनेक तर्कवितर्क लावण्यात आले. मात्र, हा व्हिडीओ आर्यन नावाच्या मुलाने काढला. एबीपी माझाने आर्यनसोबत संवाद साधला. त्यावेळी त्याने नेमकं काय घडलं?, याबाबत माहितीही दिली होती. आता, एकीकडे आर्यनच्या घराबाहेर माध्यम प्रतिनिधींनी बाईटसाठी रांगा लावल्यानेही आर्यन त्रस्त झाला आहे. दुसरीकडे आर्यनची पोलिसांकडून चौकशी केली जात आहे. आर्यन असारीला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं असून अहमदाबाद गुन्हे शाखेकडून त्याची चौकशी केली जात आहे. आर्यनसह ज्या घरावरुन त्याने हा व्हिडिओ शूट केला, त्या घरमालकासही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. 'आर्यन हा त्याच्या वडिलांसोबत साक्षीदार म्हणून जबाब देण्यासाठी आला होता. त्यानंतर त्याला त्याच्या वडिलांसोबत पाठवण्यात आले. याप्रकरणी, अद्याप कोणालाही अटक किंवा ताब्यात घेण्यात आलेले नाही, अशी माहितीही पोलिसांनी दिली.

### व्हिडिओबाबत काय म्हणाला आर्यन

विमान अपघाताचा व्हिडिओ काढणाऱ्याने आर्यन म्हटले की, मी गावात राहतो, अहमदाबादमध्ये राहत नाही. मी कधी विमान बघितले नव्हते. सध्या मी अहमदाबादमध्ये आलो होतो. यावेळी इमारतीच्या टेरेसवर आल्यानंतर विमान उडताना पाहिले. त्यामुळे मी माज्या मोबाईलमध्ये व्हिडिओ काढण्यास सुरुवात केली. परंतु, थोड्याच वेळात या विमानाचा स्फोट झाल्याने मी घाबरून गेलो. हे नेमकं काय झालंय?, हे मला समजलं नाही, असं आर्यनने सांगितलं होतं.

### ब्लॅक बॉक्स अन डीव्हीडीआर ताब्यात

दरम्यान, अहमदाबाद एअर इंडिया विमान अपघाताचा सहापेक्षा अधिक यंत्रणांकडून तपास सुरु आहे. डीजीसीए, एनएसजी, एनआयए, गुजरात एटीएसकडून कारणांचा तपास सुरु करण्यात आला आहे. तसेच सदर विमान दुर्घटनेबाबत एनआयएने घातपाताची शक्यता फेटाळली आहे. ब्लॅक बॉक्स आणि डीव्हीडीआर डेटाचं फॉरेन्सिक विभागाकडून विश्लेषण केलं जात आहे.

## विनापरवाना बांधकाम करणाऱ्या बिल्डरविरोधात थेट एमआरटीपी अंतर्गत गुन्हा

**पनवेल :** महापालिकेच्या परवानगीशिवाय बांधकाम करणाऱ्या नीळकंठ ग्रुपच्या इमारतीवर पनवेल महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे.

या बिल्डरविरोधात महापालिकेच्या कामोठे प्रभाग समितीचे अधीक्षक दशरथ भंडारी यांनी केलेल्या तक्रारीनंतर कामोठे पोलिसांनी बांधकाम व्यावसायिकांवर एमआरटीपी कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे. महापालिकेच्या या कृतीने अशा प्रकारे बांधकाम करणाऱ्यांना चाप बसणार आहे. नीळकंठ ग्रुपचे खांदेश्वर रेल्वे स्टेशन समोर गृहप्रकल्पाचे काम सुरू सहा महिन्यांपासून सुरू आहे. त्यासाठी जवळपास 20 फूट खोल खोदकाम केले आहे. हे काम करताना गटार फुटले असून फूटपाथ खचला आहे. गंभीर बाब म्हणजे हे करताना नीळकंठ ग्रुपने पनवेल महापालिकेची परवानगी घेतली नाही. या विरोधात शिवशाही सेनेचे अध्यक्ष राजकुमार पाटील यांनी आवाज उठवला होता तसेच महापालिकेत तक्रारदेखील केली होती. मात्र, त्यावर महापालिकेने कोणतीही कारवाई केली नव्हती. अखेर राजकुमार पाटील यांनी २ जून रोजी महापालिकेच्या कामोठे प्रभाग कार्यालयात आंदोलन केल्यानंतर कामोठे प्रभाग समितीचे अधीक्षक दशरथ भंडारी यांनी कारवाईचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतरही महापालिकेकडून कोणतीही कारवाई न झाल्याने राजकुमार पाटील यांनी शुक्रवारी (6 जून) महापालिकेला बेकायदा बांधकामाविरोधात कारवाई करा अन्यथा आंदोलन करू, असा इशारा दिला. त्यानंतर प्रभाग अधीक्षक दशरथ भंडारी यांनी मंगळवारी (10 जून) कामोठे पोलीस ठाण्यात नीळकंठ ग्रुपविरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी एमआरटीपी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. नीळकंठ ग्रुपने 20 फूट खोल खोदले असून त्यासाठी तहसीलदार कार्यालयाकडेही आम्ही विचारणा केली आहे. मात्र, त्यांच्याकडून अजून उत्तर आले नाही. आमच्या पाठपुराव्यानंतर पनवेल महापालिकेच्या तक्रारीनंतर नीळकंठ ग्रुपविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मेट्रो ९ चा दहिसर, काशिगाव पहिला टप्पा डिसेंबरमध्ये सेवेत



**मुंबई :** दहिसर (पूर्व) ते मीरा-भाईंदर दरम्यानच्या मुंबई मेट्रो मार्ग क्रमांक ९ प्रकल्पाने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. भायंदर पश्चिम रस्ता उड्डाण पुलाजवळील वर्दळीच्या परिसरात ६५ मीटर लांबीचा मिश्र स्टील गर्डर यशस्वीरीत्या गुरुवारी रात्री प्रस्थापित करण्यात आला. यामुळे मेट्रो ९ चा दहिसर (पूर्व) - काशिगाव पहिला टप्पा डिसेंबरमध्ये सेवेत येण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. एमएमआरडीएच्या ३३७.१० किलोमीटर लांबीच्या मेट्रो नेटवर्कचा एक महत्त्वाचा घटक असलेला मेट्रो मार्ग ९ हा दहिसर (पूर्व) ते मीरा-भाईंदर दरम्यान जोडणारा आहे. सध्या या मागार्चे काम प्रगतिपथावर आहे. या अंतर्गत, भायंदर पश्चिम रस्ता उड्डाण पुलाजवळील अत्यंत आव्हानात्मक आणि वर्दळीच्या परिसरात ६५ मीटर लांबीचा मिश्र स्टील गर्डर यशस्वीरीत्या प्रस्थापित करण्यात आला.

## नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटीची उभारणी




**नवी मुंबई :** 'मुंबई रायजिंग - क्रिएटिंग ॲन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या महाराष्ट्र सरकारच्या उपक्रमाअंतर्गत, पाच जागतिक स्तरावर प्रसिद्ध परदेशी विद्यापीठांना मुंबई आणि नवी मुंबईत त्यांच्या कॅम्पसची स्थापना करण्यासाठी इरादापत्रे अधिकृतपणे प्रदान केली जाणार आहेत. यामध्ये ॲबर्डीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी आणि इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन या विद्यापीठांचा समावेश आहे. इरादापत्र प्रदान समारंभ आज ताज महाल पॅलेस हॉटेल, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला धर्मेंद्र प्रधान, मा. केंद्रीय शिक्षण मंत्री प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची देखील उपस्थिती लाभणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली, सिडकोमार्फत उभारल्या जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय एज्युसिटीमुळे संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी मिळणार असून, हे शिक्षण विविध संस्कृतींच्या आदान-प्रदानाला चालना देईल आणि विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये सहकार्य व संवाद वाढवेल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या ५ किलोमीटर परिसरात टॉप १० परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस उभारण्याचे नियोजन आहे. ही देशातील पहिली अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी ठरणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबई व मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल.

## मुंबईत अनेक ठिकाणी पाणी साचलं, अंधेरी सब वे पाण्याखाली

### मुंबईसह कोकणात धुमाकूळ! मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत



**मुंबई:** उपनगरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईतील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी पाणी साचले असून, अंधेरी सब वे पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने तेथील वाहतूक थांबवण्यात आली आहे. रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने लोकल वाहतूक मंदावली आहे, ज्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत.

पवई, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप आणि मुलुंड परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. यामुळे सखल भागांत पाणी भरण्यास सुरुवात झाली असून, लालबहादूर शास्त्री मार्गावर भांडूपजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाली आहे.

महाराष्ट्रासह १६ राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा

महाराष्ट्र, कर्नाटक, गोव्यासह मध्यप्रदेश, राजस्थान, बिहार आदी १६ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. रविवारी राजस्थानमध्ये ...

राज्यात मान्सूनचा जोर, अनेक जिल्ह्यांत 'रेड' आणि 'ऑरेंज' अलर्ट

मान्सूनने संपूर्ण कोकण व्यापले असून, विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रासह राज्यभरात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. हवामान विभागाने पुढील तीन तासांसाठी मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरसाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे, तर संपूर्ण कोकणात पुढील दोन ते तीन दिवस मोठ्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दक्षिण गुजरात परिसरात पुढील २४ तासात कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार असल्याने, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज आहे. विदभार्तील अमरावती, गोंदिया, भंडारा आणि नागपूरमध्येही काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विशेषतः सातारा आणि पुण्यातील घाट परिसरात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

कोकणात नद्यांना पूर, जनजीवन विस्कळीत

संपूर्ण कोकणात जोरदार पाऊस सुरू असल्याने अनेक नद्या दुथडी भरून वाहत आहेत. घाट परिसरातून प्रवास करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्गसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला असून, काही ठिकाणी १०० मिमीहून अधिक पावसाची शक्यता आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटातील संरक्षक भिंतीची माती पाण्याच्या प्रवाहाने वाहून गेली आहे. डोंगरातून येणाऱ्या पाण्याच्या तीव्र प्रवाहामुळे परशुराम घाटातील गॅबियन वॉल ढासळण्याची भीती वर्तवण्यात येत आहे. परशुराम घाटाच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला असून, तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

राजापूर शहराला पुराच्या पाण्याने वेढा घातला आहे. अर्जुना आणि कोदवली नद्यांच्या संगमावर असलेल्या राजापूर शहरातील जवाहर चौकापर्यंत पुराचे पाणी पोहोचले आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.


सिंधुदुर्गातही पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत. रविवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे कणकवली-आचरा राज्य मार्गावर पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. यामुळे १५ ते २० गावांचा संपर्क तुटला असून, वाहतूक पयार्यी मागार्ने वळवण्यात आली आहे.

सिंधुदुर्गात समुद्रालाही उधाण आले असून, किनाऱ्यावर ३ ते ३.५ मीटर उंचीच्या लाटा उसळत आहेत. नद्यांच्या पाणीपातळीत कमालीची वाढ झाल्याने सखल भागात पाणी साचले आहे. होडावडे पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक पयार्यी मागार्ने वळवली आहे, तर तेरेखोल नदी इशारा पातळीवर वाहत असल्याने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

कोल्हापुरातही पावसाची संततधार

कोल्हापुरात पावसाची रिपरिप सुरूच असून, पंचगंगा नदीवरील राजाराम बंधाऱ्याची पाणी पातळी १७ फूट १० इंचावर पोहोचली आहे. राजाराम बंधाऱ्यासह सात बंधारे पाण्याखाली गेल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे. राधानगरी धरणाच्या पायथा विद्युतगृहातून प्रतिसेकंद २५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग भोगावती नदीपात्रात सुरू आहे. कुंभी धरणाच्या पायथा विद्युतगृहातूनही प्रतिसेकंद ३०० क्युसेक पाण्याचा विसर्ग कुंभी नदीपात्रात सुरू आहे. यामुळे पंचगंगा नदीच्या पात्रात पाण्याची मोठी आवक होत असल्याने भोगावती, पंचगंगा आणि कुंभी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## मुंबईच्या गिरगावात बेस्ट बस ५ फूट खोल खड्ड्यात गेली




मुंबई : मुंबईमधून गिरगाव परिसरात मेट्रो स्टेशनजवळ बेस्ट बसचा अपघात झाला आहे. गिरगाव येथील मेट्रो स्टेशनजवळ बेस्ट बस खड्ड्यात पडली आहे. मात्र सुदैवाने या अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही. पण बेस्ट बसने प्रवास करणा्या प्रवाशांमध्ये भितीचं वातावरण निर्माण झालं आहे. ही बेस्ट बस ५ फूट खोल खड्ड्यात गेली आणि त्यामुळे रस्ताही मोठ्या प्रमाणात खचल्याचे पाहायला मिळाले. या बेस्ट बसचा खड्ड्यात पडल्याचा व्हिडीओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सोमवारी सकाळी ९.०० ते ९.३०च्या सुमारास ही घटना घडली. गिरगाव चौपाटीजवळील मेट्रोच्या कामासाठी रस्त्याखाली खोदकाम सुरू असताना बेस्ट बस त्या मार्गावरून जात होती. मेट्रोच्या कामामुळे रस्त्याचा काही भाग खचलेला होता. याच खड्ड्यात बसचा मागील भाग अडकला आणि हा अपघात झाला.

दरम्यान, सिमेंटचे रस्ते जे बांधले गेले त्या रस्त्याला बेस द्यायचं असतो. पण टेक्निकली गोष्टी घाईघडबीत झाल्या आहेत. रस्त्यांचे काम अतिशय निकृष्ट दजार्चे झाले आहे. कंत्राटदाराला घाईघाईत काम करायला लावले आणि निकृष्ट दजार्चं काम झालं. मे महिन्यात पाऊस पडला आणि तरीही कंत्राटदाराला पटापट काम करा असे सांगण्यात आलेले आहे, असे मनसे नेते यशंवत किल्लेदार यांनी सांगितले.

या घटनेनंतर घटनास्थळी पोलीस आणि महापालिका कर्मचारी दाखल झाले. मात्र, स्थानिकांनी त्यांच्यावरही हलगर्जीपणाचा आरोप करत कारवाईची मागणी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. या प्रकारामुळे मेट्रो प्रकल्पाच्या कामाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रशासनाने तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संतप्त नागरिकांनी केली आहे.

## मनपा कार्यालयात विजेचा अनावश्यक वापर




**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या तसेच ऊर्जा विभागाच्या वतीने विजेची बचत करण्याचे आवाहन सर्वांना करण्यात येत असून सुद्धा अनेक शासकीय, महापालिका कार्यालयात वीज वाया घालण्याचे प्रकार निदर्शनास येत आहे.

वीजेची बचत करणे अधिकाऱ्यांची जबाबदार आहे; परंतु काही अधिकाऱ्यांकडून विजेची बचत होताना दिसत नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश वराडे यांनी केली मुंबई महापालिका प्रशासनाकडे केली आहे. भांडुप (प.) येथील मनपा एस विभागातील रस्ते विभागाचे रस्ते अभियंता कल्पना मेस्त्री (कोतवाल), अलंकार वीर, सुशांत पाटील या अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये सदर संबंधित अधिकारी जागेवर नसताना सुद्धा लाईट, पंखा चालू असल्याचे समोर आले असून येणाऱ्या आगावू वीज बिलाचा भुर्दंड पालिकेला सोसावा लागत आहे.

कामानिमित्त व इतर ठिकाणी जाण्यापूर्वी लाईट, पंखा बंद करुन विजेची बचत करायची सोडून, वीज वाया घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी वराडे यांनी मनपा एस विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त अलका ससाणे यांच्याकडे केली आहे.

## बोरिवली ते ठाणे भुयारी रस्ता प्रकल्प पुनर्वसनाला गती



**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) ठाणे (टिकुजिनीवाडी) ते मागाठाणे-बोरिवली दरम्यान प्रस्तावित दुहेरी भुयारी रस्ता प्रकल्पाची कामे प्रगतिपथावर आहेत. या प्रकल्पासाठी मागाठाणे परिसरातील रूपवते नगर, मिलिंद नगर, फरलेवाडी, एस.आर.ए.प्रकल्पातील तसेच रस्त्यालगतच्या फूटपाथवरील अंदाजे ५७२ झोपड्या बाधित होत आहेत. प्रकल्पाचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रकल्पग्रस्तांचे तात्काळ पुनर्वसन होणे गरजेचे आहे. त्यासाठी एमएमआरडीएने तीन पयार्यांची रूपरेषा जाहीर केली असून, बाधित नागरिकांनी या पयार्यांपैकी कोणता पर्याय स्वीकारायचा आहे हे लेखी स्वरूपात सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे:

१. आर्थिक मोबदला: एमएमआरडीएच्या आर्थिक मोबदला धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या बाधित होणाऱ्या झोपड्यांचे क्षेत्रफळानुसार देय आर्थिक मोबदला स्वीकारता येईल.

२. स्थायी निवास: मुंबई महानगर विकास प्राधिकरणातर्फे बोरीवली इंटिग्रेटेड वसाहतीमधील सदनिका व मीरा-भाईंदर येथील रेंटल हाऊसिंग योजनेतील मे. गुजरात व सोनम इंटरप्राईजेस यांनी विकसित केलेल्या सदनिका प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार पुनर्वसनासाठी कायमस्वरूपी उपलब्ध करून देण्यात येतील.

३. एसआरए प्रकल्पामार्फत पुनर्वसन: झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील मे.भारद्वाज विकसकामार्फत राबविण्यात येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार त्यांना समाविष्ट केले जाईल. विकासकामार्फत प्रकल्प बाधितांना त्याच ठिकाणी कायमस्वरूपी सदनिका देण्यात येणार असून तात्पुरत्या स्वरूपात त्यांना भाडे अथवा सदनिका उपलब्ध करून देण्यात येतील. एमएमआरडीएने सर्व प्रकल्पबाधित नागरिकांना सूचना केली आहे की त्यांनी वरील तीन पयार्यांपैकी योग्य पर्याय निवडून त्याबाबत लेखी अर्ज तात्काळ एमएमआरडीएकडे सादर करावेत.



# उष्णतेपासून बचाव होण्यासाठी अवलंबवा या १० टिप्स

**उन्हाळ्याचे दिवस सुरु झाले आहेत. एप्रिल, मे, जून मध्ये खूप उन्हाळा असतो. अनेक लोकांना उष्णता सहन होत नाही. तसेच डिहाइड्रेशन झाल्यामुळे अनेक प्रकरच्या समस्या निर्माण होतात. जसकी उल्टी होणे, चक्कर येणे, किडनी मध्ये समस्या, डायरिया होणे इतर. चला तर जाणून घेऊ या उष्णतेपासून वाचण्यासाठी या दहा टिप्स**

१. पुष्कळ पाणी प्या. पण पाणी पितांना हे लक्षात घ्या की पाणी कुठले आहे, पाणी फ्रीजमधील नसावे आणि स्वच्छ पाणी असावे.

२. घरातून जेव्हापण बाहेर निघाल तेव्हा काहीतरी थोडेसे खाऊन आणि पाणी पिऊन निघा. तसेच सोबत एक पाण्याची बाटली ठेवा.

३. घराबाहेर निघतांना टोपी घाला व कानांना झाकून ठेवा. तसेच डोळ्यांवर उन्हाचा चश्मा नक्की घाला.

४. प्रत्येक दिवशी नियमित कांदा खा व सोबत ठेवा.

५. उन्हाळ्यात फळे, फळांचा रस, दही, मठ्ठा, ताक, जलजीरा, लस्सी, कैरीचे पन्ह, कैरीची चटनी खा.

६. हलकेसे लवकर पचेल असे जेवण करा.

७. नरम, मऊ, सूती कपडे घाला म्हणजे गरमी होणार नाही.

८. एसीमधून लगेच उन्हात जाऊ नका व उन्हातून लगेच एसीमध्ये जाऊ नका.


९. तळलेले, मसालेदार पदार्थ सेवन केले तर तुमचे पोट खराब होऊ शकते.

१०. यासोबतच वेळोवेळी आवश्यकतानुसार ग्लूकोजचे सेवन करा आणि आपल्या उर्जेचा अनावश्यक उपयोग करू नका.

# पायांमध्ये हे ४ बदल कोलेस्ट्रॉल वाढल्याचे देतात संकेत

## दुर्लक्ष केल्यास हृदयविकाराचा झटका येऊ शकतो

**आजकाल चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे लोकांमध्ये उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या सामान्य झाली आहे. कोलेस्ट्रॉल हा मेणासारखा चिकट पदार्थ आपल्या शरीरात असतो. कोलेस्ट्रॉलचे दोन प्रकार आहेत, एक गुड कोलेस्ट्रॉल आणि दुसरे बॅड कोलेस्ट्रॉल. जेव्हा शरीरात बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते तेव्हा अनेक गंभीर आजार होऊ लागतात. हे बॅड कोलेस्ट्रॉल रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ लागते, त्यामुळे रक्ताभिसरण मंदावते. यामुळे ब्लॉकेज, हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. जेव्हा वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते तेव्हा शरीरात अनेक प्रकारची लक्षणे दिसतात. ही लक्षणे तुमच्या पायातही दिसू शकतात. आज या लेखात आम्ही तुम्हाला पायांमध्ये दिसणाऱ्या काही लक्षणांबद्दल सांगणार आहोत, जे उच्च कोलेस्ट्रॉल दर्शवू शकतात.**





थंड पाय- हिवाळ्याच्या काळात पायांना थंडी वाजणे सामान्य गोष्ट आहे. परंतु जर तुमचे पाय आणि तळवे नेहमी थंड असतील तर ते उच्च कोलेस्ट्रॉलचे लक्षण असू शकते. उन्हाळ्यातही तुमचे पाय थंड राहिल्यास या स्थितीकडे दुर्लक्ष करू नका आणि ताबडतोब डॉक्टरांकडून तपासणी करून घ्या.

पायांमध्ये वेदना आणि पेटके- उच्च कोलेस्ट्रॉलमुळे, पायांमध्ये तीव्र वेदना आणि पेटके जाणवू शकतात. जेव्हा पायांच्या धमन्या ब्लॉक होतात तेव्हा ऑक्सिजनयुक्त रक्त पायांच्या खालच्या भागात पोहोचू शकत नाही. यामुळे पाय दुखणे आणि जडपणा जाणवू शकतो. जर तुम्हालाही अशा प्रकारचा त्रास होत असेल, तर तुम्ही ताबडतोब तुमच्या कोलेस्ट्रॉलची पातळी तपासा.

पायांच्या रंगात बदल- कोलेस्ट्रॉल वाढल्यामुळे पायांच्या त्वचेचा रंग बदलू लागतो. जेव्हा उच्च कोलेस्ट्रॉल असते तेव्हा शरीरात रक्तप्रवाह नीट होत नाही. त्यामुळे पेशींना पुरेसे पोषण मिळत नाही. यामुळे पायांची त्वचा वांगी किंवा निळी दिसू शकते. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करणे टाळा.

पायाच्या जखमा बऱ्या होत नाहीत- पाय किंवा तळव्यावर झालेली जखम लवकर बरी होत नसेल तर ते उच्च कोलेस्ट्रॉलचे लक्षण असू शकते. शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्यामुळे रक्ताभिसरण नीट होत नाही. यामुळे जखम लवकर भरून येत नाही. अशा परिस्थितीत आपण त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा.

जेव्हा शरीरात खराब कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते तेव्हा शरीरात अनेक प्रकारची लक्षणे दिसू शकतात. तुमच्या पायात असे बदल दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.

# त्वचेच्या पाच समस्या दूर करेल वेलचीचे तेल



**वेलचीच्या तेलात अँटीबैक्टीरियल गुण असतात. तसेच हे तेल चेहऱ्यावरील मरूम देखील कमी करते व त्वचेचे सूजने कमी करायला मदत करते.**

**वेलचीला इंग्रजीमध्ये उरअॅवरो म्हणतात. ही एक प्राचीन औषधी आहे जी आपल्या आरोग्यासाठी चांगली असते. तसेच यासोबत वेलचीचे तेल त्वचेसाठी देखील खूप फायदेशीर असते. चला जाणून घेऊ या वेलचीचे तेल कसे वापरावे व कसे ते त्वचेला उजळ बनवते.**

### पुटकुळी आणि मुरुम यांचा उपचार–

वेलचीच्या तेलात अँटीबैक्टीरियल गुण असतात. जे त्वचेवरील पुटकुळी आणि मुरुम यांना कमी करायला मदत करतात. तसेच त्वचेचे सूजने देखील कमी करते आणि त्वचेला आरोग्यदायी बनवते. या तेलाला रोज त्वचेवर लावल्यामुळे पुटकुळी आणि मुरुम यांची समस्या दूर होते.

### त्वचेचा कोरडेपणा दूर करते–

वेलचीच्या तेलात विटामिन उ चे प्रमाण चांगले असते. जे त्वचेला मऊ आणि उजळ बनवते. हे तेल दररोज लावल्यामुळे त्वचेचा कोरडेपणा दूर होतो. तसेच त्वचा सूंदर आणि आरोग्यदायी दिसते.

### त्वचेची जळजळ आणि सूजने कमी करते–

वेलचीच्या तेलात अँटी -इन्फ्लेमेटरी गुण असतात. जे त्वचेचे जळजळ आणि सूज कमी करते. या तेलाच्या नियमित उपयोगामुळे त्वचा लवकर बरी होते.

### त्वचेचा रुक्षपणा दूर करते–

वेलचीच्या तेलात असलेले विटामिन ए आणि इतर आवश्यक पोषक तत्व त्वचेला ओलावा देतात. त्वचेच्या रुक्षपणा दूर होण्याकरिता हे तेल नियमित लावणे फायदेशीर ठरते.

### वाढत्या वयाचे लक्षणे कमी करते–

वेलचीच्या तेलात अँटीऑक्सिडेंट्सचे प्रमाण असते. हे त्वचेला तरूण ठेवायला मदत करते. म्हणून हे तेल रोज लावल्यामुळे त्वचेवर सुरकुत्या येत नाही व वाढत्या वयाचे लक्षण दिसत नाही.

या प्रकारे वेलचीच्या तेलाचा उपयोग करून त्वचेला अनेक समस्यांपासून दूर ठेऊ शकतो. तसेच हे तेल एक आरोग्यदायी आणि सुंदर त्वचा प्रदान करते. या तेलाचा रोजच्या दैनंदिन जीवनात उपयोग केल्याने उजळ आणि चमकदार त्वचा प्राप्त होते.

# तुमचे कंप्यूटर निर्माण करित आहे गंभीर आजार



आजच्या काळात आपल्याला नेहमी कंप्यूटरच्या माध्यमातून घडणाऱ्या अपराधांची माहिती मिळते आपल्या कंप्यूटरच्या सुरक्षासाठी आपण चांगल्या प्रकारे बंदोबस्त करतो. जसेकी फायरवॉलची सेटिंग बदलणे किंवा अँटी वायरस बदलणे इतर. पण हा विचार कधी तुमच्या मनात आला का की, कंप्यूटरवर जास्त काम केल्याने किती जास्त दुष्परिणाम आरोग्यावर होतात. जे लोक जास्त वेळ कंप्यूटरच्या समोर बसतात. त्यांना अनेक प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागतो. पाठीचे दुखणे, डोळे दुखणे किंवा जे लोक की-बोर्डचा अधिक उपयोग करतात, त्यांचे हात दुखणे ही सामान्य गोष्ट आहे. या समस्यांना साधारण समस्या म्हणून दुर्लक्षित करतात. पण पुढे जावून हे साधारण दुखणे मोठे दुखणे बनते. या आजाराला रिपिटेटिव स्ट्रेस सिंड्रोम बोलले जाते. या सिंड्रोममध्ये टेंडोनाइटिस आणि कार्पल टनल सिंड्रोम सहभागी आहे. टेंडोनाइटिस सिंड्रोममध्ये टेंडन्सवर सारखा जोर पडल्यामुळे ते जळून जातात. कार्पल टनल सिंड्रोममध्ये नसांवर परिणाम होतो. जे हाताच्या बोटांना जोडतात.

अजूनपर्यंत वैज्ञानिक दृष्टीने या गोष्टीचे निवारण झाले नाही आहे की कम्प्यूटरमधून उत्पन्न होणाऱ्या रेडियेशनमुळे त्वचा संबंधी किंवा प्रेगनेन्सी संबंधी काही समस्या निर्माण होऊ शकते, पण सावधानी बाळगणे उपचार घेण्यापेक्षा चांगले असते. सर्वात आधी हे पाहावे की, तुमची काम करण्याची जागा आरामदायी आहे का? तुमच्या कंप्यूटरच्या मॉनिटरला अश्या ठिकाणी ठेवा की तुमचे डोळे आणि त्याच्या मध्ये अर्ध्या हाताचे अंतर असेल. की-बोर्ड ऑपरेटर असा हवा की की-बोर्ड उपयोग करतांना ज्यामध्ये मनगटला आराम देईल असे पॅड लागलेले हवे. माउसला अश्या जागी ठेवा जिथे तुम्ही आरामात हात ठेऊ शकाल आणि हात आणि खांद्यांना काही समस्या येणार नाही. आपल्या बसायच्या पद्धतीवर लक्ष द्यावे एकाचा जागेवर जास्त वेळ बसू नका. स्क्रीनला डोळे मोठे करून पाहणे हे नुकसानदायक असते. यामुळे तुम्ही कम्प्यूटर विजन सिंड्रोमने ग्रस्त होऊ शकतात. प्रयत्न करा की एक एक तासाने ब्रेक घ्याल. अश्या छोट्या छोट्या सावधानी बाळगल्यावर आपण नको असलेले दुखणे आणि थकवा यांपासून मुक्ती मिळवू शकतो.

# रात्री झोप येत नाही का?

## झोपण्यापूर्वी करा हे काम



**आजकालच्या धावपळीच्या जीवनात तणाव मुक्त रहाणे कठीण झाले आहे. कधी घरातील टेंशन तर कधी ऑफिसमधील टेंशनमुळे लोक तणावात असतात. याचे परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतात. तसेच चांगली झोप देखील येत नाही. नियमित झोप झाली नाहीतर व्यक्तीची चिडचिड होते. ज्याचे परिणाम त्यांच्या कामावर उमटतात. तुम्हाला देखील चांगली झोप येत नसेल किंवा रात्री अनेक वेळेस झोप उघडत असेल तर याचा परिणाम तुमच्या आरोग्यावर आणि मेंदुवर पडतो. ज्यामुळे तुमचे मानसिक आरोग्य प्रभावित होईल. याकरिता गरजेचे आहे की, तुम्ही तुमच्या जीवनशैलीत थोडा बदल करा. ज्यामुळे तुम्हाला चांगली झोप येईल.**

**केसांना तेल लावून मसाज करावा–** जर तुम्हाला रात्री झोप येत नसेल तर झोपण्यापूर्वी केसांना तेल लावा. केसांची तेलाने मॉलिश केल्याने त्यांना पोषण मिळेल. ज्यामुळे ते मजबूत होतील व तुमचा मेंदु निवांत होईल, मेंदूला आराम मिळेल. तुम्हाला फ्रेश वाटेल. तसेच हा उपाय केल्याने तुमच्या केसांची वाढ देखील होईल.

**अश्याप्रकारे करा हातांनी मसाज–** चांगल्या झोपेसाठी आवश्यक आहे की तुम्ही तणाव मुक्त असावे. याकरिता झोपण्यापूर्वी तुम्ही एक टिप्स नक्कीच अवलंबवा. तुमच्या एका हाताला वरती मानेच्या मागे घेऊन जा व दुसऱ्या हाताने तुमच्या काखेत मसाज करावा. रोज ५ ते १० मिनिट असा मसाज केल्यास झोपे संबंधित सर्व समस्या दूर होतील. तसेच तुम्हाला आलेला थकवा देखील कमी होईल. यामुळे तुम्हाला झोप व्यवस्थित येईल.

**तळव्यांचा मसाज–** हातांची मसाज केल्यानंतर पायांच्या तळव्यांचा देखील मसाज करावा. तळव्यांवर सर्वात आधी तेल लावावे. मग त्यांना हलक्या हातांनी थपथपावे. जर तुमच्या तळवे दुखत असतील तर हा उपाय केल्याने आराम मिळेल आणि झोप चांगली येईल.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार, १७ जून ते २३ जून २०२५


# संपादकीय

# विमान दुर्घटना भयावह; कशामुळे नि कोणामुळे?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक





१२ जून २०२५ ही तारीख, सर्व देशवासीयांसाठी एक भयावह मृत्यूचा थरार ऐकविणारी ठरली. कोणाच्या मनीध्यानी नसताना गुरुवारी दुपारी गुजरातमध्ये झालेल्या विमान अपघातानंतर देशाचे वातावरण हादरून गेले. परदेशी प्रवाशांना घेऊन लंडनसाठी रवाना झालेले एअर इंडियाचे विमान अहमदाबादमधील मेघानी नगर परिसरात काही मिनिटांत कोसळल्याची दुर्घटना घडते. या अपघाताची माहिती ज्यांच्या ज्यांच्या कानावर पडते त्यांची एक सार्वत्रिक प्रतिक्रिया असते, ह्बापरेह्व. बातमी वाऱ्यासारखी देशभर पसरते अन् सारा देश सुन्न झाल्याचे चित्र पाहायला मिळते. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह एकूण २४२ प्रवासी होते.

ज्या डॉक्टरांच्या हॉस्टेलच्या इमारतीवर विमान आदळले, तिथे किती नुकसान झाले. डॉक्टरांसह किती जणांचे बळी गेले हा आकडा कानावर येण्याअगोदर विमानातील २०० हून अधिक मृत्युमुखी पडल्याची बातमी हृदय हेलावणारी होती. सुदैवाने दोन प्रवासी नशीब बलवत्तर म्हणून वाचला. आता विमान जळून खाक झालं. त्यामुळे प्रवाशांची ओळख पटणे हे जिकिरीचे काम असल्याने, जे प्रवासी मृत्युमुखी पडले त्यांचे अंत्यसंस्कार कसे होणार हा नातेवाइकांच्या दृष्टीने भावनिक मुद्दा आहे. विमान प्रवाशांबरोबर काळाने डॉक्टरांच्या समूहावरही घाला घातला. दुपारचे जेवण करताना तोंडात घास पडण्याऐवजी २० हून अधिक डॉक्टरांना मृत्यूने कवटाळल्याचा प्रकार हा स्थानिक गुजरातच्या जनतेवर दुःखाचा डोंगर कोसळल्यासारखाच होता.

हा अपघात कसा झाला हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, एअर इंडियाचे विमान टेकऑफनंतर काही मिनिटांत दुर्घटना घडली. लगेच ६२५ फुटांवरील विमान अहमदाबाद हॉर्स कॅम्पजवळ कोसळले. बोईंग विमानाने आधी पेट घेतला आणि नंतर ते कोसळले. विमानाचा मागचा भाग झाडाला धडकल्याने अपघात झाला की, विमानाच्या इंजिनात बिघाड झाल्याने हा अपघात झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारतात आतापर्यंत झालेल्या विमान अपघाताच्या दुर्घटनांमध्ये अहमदाबादचा अपघात ही अलीकडची मोठी दुर्घटना मानली जात आहे. मात्र या विमान अपघाताच्या बातमीनंतर मुंबईकरांना घाटकोपरसारख्या गजबजलेल्या परिसरामध्ये २०१८ साली कोसळलेल्या विमान अपघाताची आठवण झाली.

घाटकोपरमध्ये कोसळलेले विमान हे लहान आकाराचे म्हणजेच चार्टर विमान होते. चाचणी उड्डाणादरम्यान म्हणजेच टेस्ट फ्लाईटदरम्यान किंग एअरचे चार्टर विमान अपघातग्रस्त होऊन वस्तीत शिरले होते. तसे पाहिले तर भारतात पहिला विमान अपघात १९३८ मध्ये झाला होता. एअर फ्रान्सचे पोटेझ विमान मध्य प्रदेशातील दातियाजवळ कोसळले. त्यात सात जणांचा मृत्यू झाला होता. गेल्या पंधरा वर्षांतील भारतातील दुसरा मोठा अपघात कर्नाटकातील मंगळूरु येथे मे २०१० मध्ये घडला, या अपघातात १५८ जण मृत्युमुखी पडले होते. फेब्रुवारी १९९० मध्ये बंगळूरुमध्ये एअरबस ए ३२० विमान लँडिंग करताना धावपट्टीवरून घसरले आणि शेतात पडले, त्यात ९२ जणांचा मृत्यू झाला होता. पायलटच्या चुकीमुळे आतापर्यंत अनेक दुर्घटना घडल्या आहेत. मात्र, याआधी विमानावर दहशतवादी हल्लाही झाला होता. तो जून १९८५ साली खलिस्तान समर्थकांनी विमानावर दहशतवादी हल्ला केला होता. एअर इंडिया फ्लाइट १८२ त्यावेळी आयर्लंडच्या किनाऱ्याजवळ अटलांटिक महासागरात बॉम्बस्फोटात उडवून देण्यात आले होते. त्यात ३२९ लोकांचा मृत्यू झाला होता.

आतापर्यंत झालेल्या विमान अपघाताची कारणे पाहिली तर वैमानिकाची चूक हे विमान अपघातांचे एक प्रमुख मानले जाते. वैमानिकांकडून जेव्हा टेकऑफ दरम्यान वेग, धावपट्टीच्या लिफ्ट ऑफ पॉइंट किंवा पिच अँगलचा चुकीचा अंदाज घेतला जातो, तेव्हा अपघात होतात. आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक अहवालांनुसार, टेकऑफ आणि लँडिंग दरम्यान होणाऱ्या बहुतेक अपघातांमध्ये मानवी चूकही कारणभूत ठरली आहे. त्याचे कारण, टेकऑफ अपघातांपैकी ६५% मानवी चुकांमुळे होतात आणि २०% तांत्रिक बिघाडामुळे तर, १०% हवामानामुळे होतात, ५% इतर कारणांमुळे होतात, अशी जगभरातील आकडेवारी सांगते.

संपूर्ण टेकऑफ प्रक्रिया पायलटच्या नियंत्रणाखाली असते. प्रत्येक निर्णय काही सेकंदांत घ्यावा लागतो. टेकऑफ दरम्यान ऑटो-पायलट नसतो, सर्व नियंत्रण मॅन्युअल असते. टेकऑफचे नियोजन आणि आपत्कालीन स्क्रिप्ट देखील पायलटच्या योजनेवर अवलंबून असते. म्हणूनच टेकऑफ दरम्यान अपघात झाल्यास, विमान वाहतूक तज्ज्ञ प्रथम पायलटच्या निर्णयाची आणि प्रतिक्रियेची तपासणी करत असतात. तसेच खराब हवामानामुळे टेकऑफ दरम्यान विमान अपघात होण्याची कारणे पुढे आलेली आहेत. टेकऑफ दरम्यान जोरदार वारे, गडगडाट, कमी दृश्यमानता किंवा मायक्रोबर्स्ट ही अपघातांची प्रमुख कारणे असतात. इंजिनमध्ये समस्या असल्यास, पक्षी आदळल्यास किंवा सिस्टममध्ये बिघाड झाल्यास, पायलटला काही सेकंदांत निर्णय घ्यावा लागतो की टेकऑफ सुरू ठेवायचे की धावपट्टीवर विमानाला काही प्रकारे थांबवण्याचा प्रयत्न करायचा. अहमदाबाद विमान दुर्घटनेतील पायलट सुमित सबरवाल हा सुद्धा आज जगात नाही. नक्की काय घडले हे आता सांगता येणार नसले तरी, ज्या पद्धतीने गेल्या काही वर्षांत विमान प्रवाशांची संख्या वाढलेली आहे. ते पाहता, भविष्यात अपघात होऊ नये यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर व्हायला हवा. जीवाची किंमत मोठी आहे. एका क्षणार्धात होत्याचे नव्हते... असे एका विमान अपघातातून घडू शकते. अपघात टाळण्यासाठी विमान कंपन्यांबरोबर केंद्र सरकारनेही अधिक लक्ष घालायला हवे.

# बिनविरोध निवडीचा गुंता



**निवडणुकीच्या रिंगणात जर एकच उमेदवार असेल तर निवडणूक आयोगाने तो उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर न करता त्या मतदार संघात निवडणूक घेऊन त्या उमेदवाराला किमान १०-१५ टक्के मते मिळाल्यासच त्याला निवडून आल्याचे जाहीर करावे, यासाठी अशा उमेदवारांना किमान किती टक्के मते मिळाली पाहिजेत या संबंधी संसदेने कायदा करावा,असे मत न्या. सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने व्यक्त केले असून यासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी केंद्र सरकारला चार आठवड्याची मुदत दिलेली आहे.**

एखादा संपन्न उमेदवार त्याच्या विरोधातील इतर सर्व उमेदवारांना प्रलोभन दाखवून अथवा गुंडगिरीच्या आधारे त्यांचे उमेदवारी अर्ज मागे घ्यावयास भाग पाडत असल्याच्या घटना घडू शकतात. यासाठी निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार असला तरी निवडणूक घेऊन त्याला किमान १०-१५ टक्के तरी मते मिळाली पाहिजेत, अशी कायदेशीर तरतूद करणे आवश्यक असून ते प्रगतिशील पाऊल ठरेल. जर अशा उमेदवाराला पाच टक्के मतदारांचाही पाठिंबा मिळत नसेल तर अशा व्यक्तीला संसदेमध्ये खासदार म्हणून जाऊ देणे योग्य कसे ठरते, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

विधी सेंटर फॉर लीगल रिसर्चने दाखल केलेल्या एका जनहित याचिकेत निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार असल्यास तो बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यासंबंधीचे लोकप्रतिनिधित्व कायदा, १९६१ चे कलम ५३(२)हे घटनाबाह्य असून ते रद्द करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज वि. युनियन ऑफ इंडिया या प्रकरणात १३ सप्टेंबर, २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रिंगणात उतरलेल्या उमेदवारांपैकी एकही उमेदवार हा लोकप्रतिनिधी होण्यास लायक, पात्र व पसंत नाही असे जर मतदारांचे मत असेल तर त्यांना ते मत व्यक्त करण्याचा अधिकार नकारात्मक मतदानाद्वारे देणे आवश्यक आहे. यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर किंवा मतपत्रिकेवर 'वरीलपैकी कोणीही नाही' असा पर्याय मतदारांना उपलब्ध करून द्यावा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिला होता.

मतदारांना नकारात्मक मत देण्याचा अधिकार नाकारणे याचा अर्थ घटनेच्या अनुच्छेद १९ (१)(अ) अन्वये नागरिकांना प्रदान करण्यात आलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य तसेच अनुच्छेद २१ नुसार देण्यात आलेले सन्मानाने जीवन जगण्याचा मुलभूत हक्क नाकारणे होय, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्यामुळे निवडणुकीसाठी एकच उमेदवार उभा आहे, म्हणून निवडणूक न घेता त्या उमेदवाराला बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करणे म्हणजे मतदारांना 'वरील पैकी कोणीही नाही' (नोटा) या पर्यायाचा वापर करण्यास प्रतिबंधित करणे असून त्यामुळे मतदारांना असलेल्या नकारात्मक मतदान करण्याच्या मुलभूत हक्काचा भंग होतो. त्यामुळे लोकप्रतिनिधित्व कायद्याचे कलम ५३ (२) रद्द करून निवडणुकीसाठी एकच उमेदवार उभा असला तरी तेथे निवडणूक घेण्याचा आदेश निवडणूक आयोगाला द्यावा, या मागणीसाठी विधी सेंटर फॉर लीगल रिसर्चने याचिका दाखल केलेली असून, त्यावर न्या. सूर्य कांत यांनी त्यासंबंधी आपले अनुकूल मत व्यक्त केलेले आहे.

घटनात्मकदृष्ट्या हे योग्य आहे का, हे पाहणे आवश्यक आहे. नकारात्मक मतदानाचा हक्क हा मुलभूत अधिकार आहे का? मुळात लोकसभेच्या निवडणुकीत गेल्या ३५ वर्षांत केवळ एकच उमेदवार (२०२४ मध्ये) बिनविरोध निवडून आलेला आहे. त्यामुळे भविष्यात त्यामध्ये वाढ होईल,असे गृहीत धरून कोणताही बदल करणे योग्य आहे का?

मतदानाचा अधिकार म्हणजे निवड करण्याचा अधिकार आहे, निवड नाकारण्याचा नाही. निवड करण्याचा प्रश्न दोन किंवा दोनापेक्षा जास्त उमेदवार असतील तरच येतो. मतदानाचा अधिकार हा उमेदवारांमधून आपल्याला योग्य वाटेल अशा उमेदवाराला आपला लोकप्रतिनिधी म्हणून निवडण्याचा लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ द्वारा मतदारांना प्रदान करण्यात आलेला सकारात्मक (नकारात्मक नव्हे) वैधानिक अधिकार आहे. म्हणूनच लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या कलम ५३ (२)मध्ये निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार असेल तर तेथे निवडणूक न घेता तो उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्याची तरतूद करण्यात आलेली असून ती योग्यच आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या 'वरील पैकी कोणीही नाही' (नोटा) या अधिकारातही दोन अथवा दोनापेक्षा जास्त उमेदवारांपैकी 'कोणीही नाही' असाच अर्थ आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.


'नोटा' निवडणुकीच्या निकालावर प्रत्यक्षात कोणताच परिणाम करीत नसल्यामुळे तो निरर्थक, परिणामशून्य, कुचकामी व निरुपयोगी आहे. नकारात्मक मते म्हणजे बाद मते. त्यामुळे तो कोणत्याही प्रकारचा अधिकारच नाही, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

मतदान करण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार नसून तो लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ अन्वये मतदारांचा कायदेशीर अधिकार आहे. जर मतदानाचा अधिकार हा कायदेशीर अधिकार असेल तर नकारात्मक मतदान हा मुलभूत अधिकार कसा? आपल्याकडे गुप्त मतदान पद्धत असल्यामुळे मतदाराने कोणत्या उमेदवाराला मत दिले, हे समजत नाही, त्यामुळे घटनेच्या अनुच्छेद १९(१) (अ) मध्ये अभिप्रेत असलेले असे ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही. मूलभूत अधिकार हे व्यक्तिगत अधिकार असतात , सामूहिक नव्हे. मुळात घटनेने प्रदान केलेले मूलभूत अधिकार हे सर्व नागरिकांना प्रदान केलेले आहेत. त्यामुळे घटनेच्या अनुच्छेद १९ (१) (अ) अन्वये बहाल करण्यात आलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य तसेच अनुच्छेद २१ अन्वये प्रदान करण्यात आलेले सन्मानाने जीवन जगण्याचे स्वातंत्र्य हे मूलभूत अधिकार आहेत. परंतु, मतदानाचा अधिकार मात्र १८ वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या नागरिकांनाच आहे. त्यामुळे देशातील काही नागरिकांना मतदानाचा मूलभूत अधिकार आहे व काहींना तो अधिकार नाही. मतदान करण्याचा अधिकार जर मूलभूत अधिकार नसेल तर नकारात्मक मतदानाचा अधिकार हा मूलभूत अधिकार कसा ?

त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार असल्यास तेथे निवडणूक घेण्याची मागणी पूर्णतः चुकीची असून त्यामुळे विधी सेंटर फॉर लीगल रिसर्चची याचिका रद्द करणे आवश्यक आहे. तसेच निवडणुकीच्या रिंगणात जर एकच उमेदवार असेल तर निवडणूक आयोगाने तो उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर न करता त्या मतदार संघात निवडणूक घेऊन त्या उमेदवाराला कायद्याने निश्चित केलेली किमान मते मिळाल्यासच तो निवडून आल्याचे जाहीर करावे, यासाठी अशा उमेदवारांना किमान किती टक्के मते मिळाली पाहिजेत, या संबंधी संसदेने कायदा करावा, असे न्या. सूर्य कांत यांनी व्यक्त केलेले मतही अयोग्य आहे.

कारण मतदारसंघात मोठ्या प्रमाणात उमेदवार उभे असल्यामुळे चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या उमेदवाराला संसदेने कायद्याद्वारे निश्चित केलेल्या किमान मतांपेक्षा कमी मते मिळाली तरी त्याला विजयी घोषित करावयाचे परंतु, निवडणुकीसाठी एकच उमेदवार असल्यास त्याने मात्र किमान मतांपेक्षा कमी मते मिळविल्यास त्याला पराभूत म्हणून घोषित करावयाचे अशी कोणतीही तरतूद घटनेच्या अनुच्छेद १४ चा भंग करणारी ठरेल. (हा लेखाचा स्वतंत्र विषय आहे.) तसेच नकारात्मक मतदानाचा अधिकार हा मुलभूत अधिकार आहे, या २०१३ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावरही पुनर्विचार आवश्यक आहे.

# हा पाऊस कोणता?




**सध्या ना, या पावसाचे काहीच कळेनासे झाले आहे. मध्यंतरी, म्हणजे मे महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात पडलेला पाऊस अवकाळी असावा की वळवाचा असावा यावर आम्ही घरामध्ये घनगंभीर चर्चा केली होती. ती संपता संपता आमच्या मातोश्रींच्या व्हॉट्सॲप नामक ज्ञानप्रसारक केंद्रावर एक ज्ञानांकुर उमटले, की याला 'प्री मान्सून' म्हणजे 'पूर्वमोसमी' म्हणावे. आम्ही या ज्ञानप्रसारक केंद्राचे मोठे भोक्ते आहोत.**

आम्ही सारेच त्यातून उमटणारे विविध ज्ञानकण वेचित असतो. सांप्रत काळी आम्ही गाय आणि म्हैस यांच्या दुधातील गुणात्मक फरक जाणला आहे. असे काही गंभीर विषय आल्यानंतर त्यावर गहन चर्चा होणे आणि त्या मंथनातून आमच्यापुरते का होईना; परंतु नवनीत (पक्षी - लोणी, आम्ही नावाविषयी बोलत नाही आहोत) निर्माण होते. त्याचा आम्ही मनोज्ञपणे यथेच्छ आस्वाद घेतो. आमची ही प्रासादिक वाणी हादेखील मराठी भाषाविषयक आणि काव्य-साहित्यविषयक गटांत आम्ही सक्रिय असल्याचा क्रियाशील पुरावाच आहे. तर हे सारे असो. आता फिरून पुन्हा एकदा मूळ मुद्द्याला येऊ.

तर, मंडळी, हा पाऊस पूर्वमोसमी असावा अशी मान्यता आम्ही कुटुंबीयांनी एकमताने दिलीच होती; तोच चक्क हवामान खात्याने यास मोसमीच ठरवून टाकले. हे म्हणजे असे झाले, की आपण ज्यास 'स्टार्टर' (पक्षी - चखणा) समजावे आणि हाय रे दैवा... तोच 'मेन कोर्स' (पक्षी - जेवण) आहे, असे जाहीर व्हावे. त्यात आपण नंतर चांगला हात मारू या, असे मनाशी ठरवून सुरुवातीला हात आखडता घेतलेला असावा आणि घरी जाऊन पुन्हा गॅस पेटवावा लागणार, या विचाराची ठिणगी पत्नीच्या चेहऱ्यावर पेटावी! आम्हा काहीच समजेना. बरे, पाऊसही सर्वत्र असा काही धो धो बरसला, की याचे नाव ते! यामुळे एक मात्र घडले, सांप्रत काळात जूनच्या शेवटाला किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात रस्त्यांच्या ज्या काही नद्या आणि छोट्या-मोठ्या खड्ड्यांमध्ये तलाव निर्माण होतात, ते मे महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात निर्माण झाले. आम्ही तरी काय करणार याला, पावसाचेच चुकले.

नेहमीसारखा वेळेत पडला असता, तर आमची खड्डे खणण्याची कामे पूर्ण झाली असती, अशा अर्थाचे खुलासेही लगोलग आले. खरेच, पावसाचे चुकलेच. आम्ही दर वर्षीप्रमाणे गेल्या वर्षी वापरून कपाटातल्या खालच्या कप्प्यात निगुतीने ठेवून दिलेले पर्जन्यवस्त्र (रेनकोट हो) बाहेर काढायच्या आत पाऊस असा काही कोसळला, की वाळत घातलेली वस्त्रे वाळायची राहून गेली आणि जुलैच्या तिसऱ्या-चौथ्या आठवड्यात भिंतींना धरणारी ओल, जूनच्या दुसऱ्या दिवशी दिसू लागली.

हेही मान्य. परंतु एवढे सारे करून सवरून हा पाऊस नामक इसम एखादी व्यक्ती अचानक गायब व्हावी त्याप्रमाणे नाहीसा झाला. मग कोणी तरी पुन्हा एकदा ज्ञानामृताचे सेवन करविले, की तो पूर्वमोसमीच होता. आता म्हणजे पुन्हा एकदा सात जूननंतर मोसमी पावसाला सुरुवात होईल. याला काय म्हणावे बरे? आम्ही तर बुचकळ्यातच पडलो. म्हटले, तुम्ही एक काय ते ठरवून घ्या. बाहेर काढलेले पर्जन्यवस्त्र बाहेरच ठेवायचे आहे, की पुन्हा कपाटात, याचा निर्णय आम्ही घ्यावा की नाही? की, पुन्हा एकदा आमच्या व्हॉट्सॲप ज्ञानप्रसारक केंद्रावर उमटलेल्या ज्ञानबिंदूत म्हटल्याप्रमाणे, 'यंदा पाऊस आपल्याकडून केरळकडे आणि तिकडून अंदमानात जाणार आहे' असे घडणार आहे? तसे जर घडणार असेल, तर तिकडून यू टर्न घेऊन येण्यास त्याला किती काळ लागणार आहे? प्रश्न बरेच आहेत आणि बाहेर ढगही दाटून आले आहेत. आज सायंकाळी जर पडला, तर तो कोणता पाऊस होता, हा प्रश्न त्यात महत्त्वाचा आहे.




# चोर सोडून...

मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती यांनी गेल्या आठवड्यात गुन्हे आढावा परिषदेत सर्व पोलिसांची झाडाझडती घेतली व खडे बोल सुनावले. मुंबईसह महामुंबई परिसरातील सर्वच पोलिस आयुक्तांनी वरचेवर या प्रकारे आढावा घेण्याची गरज आहे. मुंबईतील गुन्हेगारीचे स्वरूप गेल्या दोन दशकांत पालटले आहे. तंत्रज्ञानावर पोलिसांची मदार वाढू लागली आहे, तर गुन्हेही तंत्रज्ञानाच्या बुरख्याआडून घडताहेत. या सर्व पार्श्वभूमीवर पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदविताना येणाऱ्या कटू अनुभवांतून मात्र सर्वसामान्यांची सुटका झालेली नाही. मुंबईभर विस्तारणारे सीसीटीव्हीचे जाळे गुन्हेगारांवर पाळत ठेवण्याच्या दृष्टीने चांगलेच आहे. परंतु एखाद्या नागरिकाच्या संकुलात किंवा व्यापारी गाळ्यात सीसीसीटीव्ही नसतील, तर फुटकळ चोरी (पोलिस किंवा चोरांच्या नजरेतून) झाल्यावर त्या नागरिकानेच गुन्हा केला आहे, अशा प्रकारे पोलिस धारेवर धरतात. चोरीचा ऐवज कितीचा आहे, त्यावरूनही फिर्याद नोंदविण्याचे गांभीर्य ठरणे योग्य नाही. काही दिवसांपूर्वी एका जुन्या गृहसंकुलातील सदनिकेत चोरांनी दोन-तीन घरे फोडली. रहिवाशाने याविषयी नियंत्रण कक्षात संपर्क साधला असता, सोने-नाणे गेले नाहीये ना, मग स्पॉट व्हिजिटला कुणी येणार नाही, असे सांगितले गेले. तक्रारदाराने तगादा लावल्यावर कूर्मगतीने एक व्हॅन पोहोचली, तरी पंचनामा, फोटो वगैरेची गरज पोलिसांना वाटली नाही. पोलिस ठाण्यात पोहोचल्यावरही अमलदारबाईंनीही, फिर्याद करणे कसे योग्य नाही, हेच पटवून देण्याचा प्रयत्न केला. दोन-चार हजारांच्या चोरीसाठी तुम्हाला न्यायालयात चकरा माराव्या लागतील, हे कळवळा आल्यागत सांगितले. मात्र, अशा संभाव्य टोळ्यांचा छडा लावण्याच्या दृष्टीने काही माहिती घेणे पोलिसांना महत्त्वाचे वाटले नाही. फोरेन्सिक पुरावे जतन करण्याचे पोलिस आयुक्तांनी बजावले आहे, ते त्यामुळेच.

पोलीस बातमी पत्र
संमिश्र
4
मुंबई, मंगळवार, १७ जून ते २३ जून २०२५

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार ३ टप्प्यात

## पुरेशा 'ईव्हीएम मशीन'चा अभाव कारणीभूत



■**मुंबई** : पुढील दोन महिन्यांत निवडणुकीशी संबंधित तयारी राज्य निवडणूक आयोगाकडून पूर्ण करण्यात येणार आहे. मात्र, ज्या दिवशी प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडेल त्यादिवशी 'ईव्हीएम मशीन'चा पुरेसा साठा कुठून उपलब्ध करायचा, असा प्रश्न राज्य निवडणूक आयोगाला सतावत आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे ६५ हजार 'ईव्हीएम मशीन' आहेत. परंतु, राज्यात एकाच दिवशी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १ लाख ५० हजार 'ईव्हीएम मशीन'ची गरज भासणार आहे. त्यामुळे नगर परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या निवडणुका तीन टप्प्यात घेण्याचे नियोजन असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सांगितले. राज्यातील २९ महानगरपालिकेत चार ते पाच वर्षांपासून प्रशासकीय राज आ-हे, तर २४८ नगर परिषदांचीही मुदत संपुष्टात आली असून याठिकाणी प्रशासकाच्या माध्यमातून कारभार सुरू आ-हे. या पार्श्वभूमीवर पुढील चार महिन्यांत निवडणुका घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने १३ मे रोजी राज्य सरकारला दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त होताच राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागणार आहे. विशेष म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दीड लाख ईव्हीएम मशीनची गरज भासणार आहे. परंतु राज्य निवडणूक आयोगाकडे फक्त ६५ हजार ईव्हीएम मशीन उपलब्ध आहेत. निवडणूक आयोगाकडे अतिरिक्त मशीनसाठी मागणी करण्यात येणार आहे. मात्र, मशीन उपलब्ध न झाल्यास तीन टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे नियोजन असल्याचे वाघमारे यांनी सांगितले.

**अशी पार पडणार निवडणूक प्रक्रिया**

प्रभाग रचना, प्रभाग रचनेबाबत हरकती सूचना मागवणे, त्यानंतर सूचना हरकतीवर सुनावणी, त्यानंतर अंतिम प्रभाग रचना अहवाल प्राप्त होईल, त्यानंतर आरक्षण लॉटरी, मतदारयादी तयार करणे आणि प्रत्यक्ष मतदानाचा दिवस या निवडणुकीच्या महत्त्वाच्या प्रक्रिया आहेत.

# शहरात पाऊस आला, पण रस्त्यावरील खोदकाम सुरूच




■**विरार** : वसई-विरार शहरात पावसाचे आगमन झाल्यानंतरही विविध भागांमध्ये सुरू असलेले रस्त्यांचे खोदकाम नागरिकांच्या त्रासाचे कारण ठरत आहे. शहरातील वर्दळीच्या रस्त्यावर चिखल पसरला असल्यामुळे दुचाकी घसरून मोठा अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. यातच वाहतूक कोंडीचे प्रमाण देखील वाढले आहे.शहरातील मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवर विविध विकासकामे, ड्रेनेज लाईन टाकणे किंवा पाइपलाइन बदलण्याचे काम सुरू आहे. मात्र, पावसाळ्याच्या तोंडावर ही कामे अपूर्ण राहिल्याने त्या ठिकाणी चिखल आणि पाणी साचत आहे. परिणामी, वाहनधारकांना वाहन चालवताना अडचणी येत असून, दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. विरार पूर्वेकडील चंदनसार येथील नैसर्गिक पाणी जाण्यासाठी रस्त्याच्या मधोमध खोदकाम करून उघाडीचे काम सुरू आहे. मात्र, मागील दोन महिन्यांपासून काम संथ गतीने चालत सुरू आहे. याशिवाय, खोदकामामुळे रस्त्यांचे रुंदीकरण कमी झाल्याने वाहतूक कोंडीचे प्रमाणही वाढले आहे. याचा थेट फटका सामान्य नागरिकांपासून कामावर जाणांया सर्वांनाच बसत आहे. महापालिका प्रशासनाने यासंदर्भात लवकरात लवकर ठोस पावले उचलून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सध्या सर्वत्र होत आहे. याबाबत पालिकेचे अभियंता प्रदीप पाचंगे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी कोणतेही उत्तर दिलेले ना-ही. यामुळे त्यांची भूमिका मांडता आलेली नाही.

# कल्याणमधील धोकादायक इमारतीत शासकीय कामकाज सुरू



■**डोंबिवली** : कल्याणमधील सप्तश्रृंगी इमारतीचा स्लॅब कोसळून सहा जणांचा मृत्यू झाल्यानंतर पालिका प्रशासनाने खडबडून जाग आली. धोकादायक इमारतींवर कारवाईला सुरुवात केली. मात्र, डोंबिवली पश्चिमेकडील पु. भा. भावे सभागृह ही इमारत अतिधोकादायक ठरवली असतानाही, येथे महसूल विभागाचे मंडळ अधिकारी कार्यालय आणि तलाठी कार्यालय सुरूच आहे. त्यामुळे येथे येणारे नागरिक आणि अधिकारी दोघांचाही जीव धोक्यात आहे.

या धोकादायक इमारतीत ठाकुर्ली, नवगाव, डोंबिवली, पाथर्ली, आयरे, भोपर, गावदेवी, काटई, संदप, उसरघर, कांचनगाव, कोपर आणि जुनी डोंबिवली या गावांचे ग्राम महसूल अधिकारी कार्यरत आहेत. यामुळे येथे नियमितपणे नागरिकांची वर्दळ असते. याच पार्श्वभूमीवर तहसीलदार सचिन शेजाळ यांनी महापालिकेला पत्र देऊन या कार्यालयांसाठी सुरक्षित पयार्यी जागा उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे.

महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे प्रदेश सचिव संतोष केणे, प्रणव केणे आणि राहुल केणे यांनी ५ जून रोजी या इमारतीची पाहणी केली. त्यांनी मंडळ अधिकारी रविंद्र जमदारे व तलाठी कासार यांच्याशी चर्चा करून कर्मचाऱ्यांची माहिती घेतली. कर्मचाऱ्यांनी नवीन आणि सुरक्षित ठिकाणी कार्यालय स्थलांतरित करण्याची मागणी केली.

या इमारतीबाबत 'ह' प्रभाग क्षेत्रीय सहाय्यक आयुक्तांना आधीच पत्र पाठवण्यात आले असून, प्रशासनाने तत्काळ निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांचे आणि नागरिकांचे प्राण वाचवावेत, अशी संतोष केणे यांनी मागणी केली आहे. धोकादायक खासगी इमारती रिकाम्या करण्यावर भर दिला जात असला तरी, शासकीय इमारतींकडे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली. दुर्घटना होण्याआधीच कारवाई व्हावी, अशी स्पष्ट भूमिका काँग्रेसकडून मांडण्यात आली आहे.

# विरार पूर्वेकडील रखडलेल्या कामांमुळे रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे



**कुठे पडलेत खड्डे :** विरार पूर्व नारंगी बायपास रोड, चंदनसार रोड, साईनाथ रोड, नारंगी गावमार्ग.

"हा रस्ता निसरडा झाल्यामुळे जीवघेणा ठरू लागला आहे. यामुळे रस्त्यावर खडी टाकून खड्डे भरण्यात यावेत. जेणेकरून जीवितहानी होणार नाही."

**-संदेश तांबे - सामाजिक कार्यकर्ता**

■**विरार** : विरार पूर्वेकडील नारंगी बायपास रस्त्यावर मागील पाच वर्षांपासून उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू आहे. मात्र रखडलेल्या कामांमुळे या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे वाहन चालकांना तारेवरची कसरत करून वाहने चालवावी लागत आहेत. वसई- विरार शहरात दोन दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने शनिवारी सकाळपासूनच बरसण्यास सुरुवात केली होती. यामुळे शहराच्या विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. यातच नारंगी बायपास या रस्त्यावर उड्डाणपुलाचे बांधकाम रखडल्यामुळे या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे या खड्ड्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. या साचलेल्या पाण्यातून वाहन चालकांना रस्त्याचा अंदाज न आल्यामुळे दुचाकी वाहनांचा अपघात होऊ लागला आहे.

नारंगी बायपास रस्ता हा विरार पश्चिमेकडे तसेच मुंबई -अहमदाबाद राष्ट्रीय महामागार्ला जोडणारा रस्ता आ-हे. त्यामुळे या रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडल्यामुळे वाहतूक कोंडी देखील होत असते. यामुळे परिसरात राहणांया नागरिकांना या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. तासंतास रस्त्यावर वाहतूक कोंडी झाल्यामुळे वाहनचालक देखील हैराण झाले आहेत. रस्त्यावर पडलेल्या खड्डयांची डागडुजी कर-ावी, अशी मागणी आता वाहन चालकांनी केली आहे.नालासोपारा मतदारसंघाचे आमदार राजन नाईक यांनी या उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी केली होती. यावेळी त्यांनी संबंधित अधिकांयांना धारेवर धरत काम जलद गतीने करण्याचे आदेश दिले होते. मात्र, अधिकांयांनी आमदारांच्या आदेशालाच केराची टोपली दाखवली असल्याचे दिसू लागले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे उड्डाणपुलाच्या बाजूने वाहने सुरळीत निघण्यासाठी दोन्ही बाजूने रस्ते चालू करणे गरजेचे आहे. असे होत नसल्यामुळे नागरिकांना याचा ना-हक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यात मोठ मोठे खड्डे पडले आहेत. त्यातच रस्त्यात चिखल पसरलेला आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागाकडून चेंडू पुरातत्व विभागाच्या कोर्टात



छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या आरमारांची मुहूर्तमेढ कल्याणमधील दुगार्डी किल्ला येथे रोवली. त्यामुळे ऐतिहासिक महत्त्व असलेले किल्ले दुगार्डी हे लाखो शिवभक्तांचे श्रद्धा स्थान असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोट्यवधी रुपये खर्च करून किल्ल्याची डागडुजी तसेच बुरुजाचे, कमानीचे काम सुरू आहे. अशातच किल्ल्याच्या समोरील बाजूस असलेली संरक्षक भिंत अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात बुधवारी पहाटे कोसळली. कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी अधिकारी, ठेकेदार यांना हलगजीर्बाबत खडे बोल सुनावले. तर गुरुवारी खासदार सुरेश म्हात्रे यांनी दुगार्डी किल्ल्याच्या भिंतीच्या ढासळलेल्या भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी ठेकेदारावर कारवाईची मागणी केली. ते म्हणाले, या दुर्घटनेत पुरातन ऐतिहासिक ठेव्याची निगा राखण्याविषयीची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभागाकडून सुरू आहे.

■**कल्याण** : कल्याणातील इतिहास कालीन दुगार्डी किल्ल्याची संरक्षक भिंत बुधवारी पहाटे झालेल्या पावसात कोसळल्याची घटना घडली. या पुरातन ऐतिहासिक ठेव्याची जबाबदारी आपल्या अंगावरून झटकण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभाग यांची जुंपली असल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे. सरकारी असलेल्या दोन्ही विभागाची टोलावाटोली पाहता, या दुर्घटनेला जबाबदार कोण, असा प्रश्न आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी उपविभाग कल्याण यांना याविषयी पत्र दिले आहे. या पत्रात कल्याण येथील दुगार्डी किल्ल्याच्या भोवती बांधण्यात आलेली संरक्षण भिंत कोसळल्याबाबत संरक्षण भिंतीचे काम हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेले नाही. हे काम पुरातत्व विभागाकडून करण्यात आले आहे. त्यामुळे या कोसळलेल्या संरक्षण भितीबाबत या विभागाकडून कोणतीही कार्यवाही होणे क्रमप्राप्त होत नाही. हे आपल्या माहितीसाठी आणि पुढील उचित कार्यवाहीसाठी स्पष्ट केले जात आहे. अशा आशयाचे पत्र उपविभागीय अधिकारी सा. बां, उपविभाग क्रमांक कल्याण यांनी पुरातत्व विभागाला दिले आहे.

# ठाण्यातील रस्ते खड्ड्यांच्या गर्तेत... ठाणेकर स्मार्ट रस्त्यांच्या प्रतीक्षेत



**दर पावसाळ्यात आश्वासनांचे मलम**

स्मार्ट सिटी ही संकल्पना केवळ विकासकामांच्या घोषणांमध्ये अडकली आहे. मेट्रोचे खांब उभे राहात आहेत, बुलेट ट्रेनच्या स्वप्नांची चर्चा रंगते आहे, पण सामान्य ठाणेकराला आजही रस्त्यावरील खड्डे चुकवतच आपला प्रवास पार करावा लागतोय. प्रत्येक पावसाळ्याच्या तोंडावर आश्वासनांची सरबत्ती होते. "यंदा खड्डेमुक्त ठाणे" पण प्रत्यक्षात ठाणेकरांचा प्रवास खड्डे चुकवत होत असतो. रस्त्यांचे काम करताना तात्पुरत्या डांबराच्या थराने खड्डे बुजवले जातात. दोन पावसांनंतर हे थर उखडून पुन्हा पूर्ववत खड्डे समोर येतात. हे दृश्य ठाणेकरांना दरवर्षी नव्याने बघावे लागते. शहरातील विकासाचे दावे करणारे नेते, मात्र या समस्यांकडे फक्त आश्वासनांचे मलम लावून फुंकर मारतात. घोडबंदर रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रशासनाची आणि राजकीय नेत्यांची उदासीनता स्पष्टपणे दिसते.

■**ठाणे** : ठाणे शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र मोठमोठे टॉवर, मेट्रोच्या उपक्रमातून दिसून येत आहे. मात्र स्मार्ट शहराचे रस्ते खड्डयात अडकल्याचे वास्तव पहावयास मिळत आहे. ठाण्यातील खड्डयांची समस्या प्रत्येक पावसात निर्माण होते आणि त्यावर तात्पुरते डांबराचा अन्यथा मास्टिक अस्फाल्टचा लेप लावून झाकूण टाकले जाते. यामुळे स्मार्ट शहराचे रस्ते कधी स्मार्ट होणार? याची प्रतीक्षा ठाणेकर करत आहेत.

ठाणे शहरातील मुख्य रस्ता असलेल्या घोडबंदर रोडची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. कासारवडवली, वाघबीळ, माजिवडा, ओवळा आदी ठिकाणी रस्त्याच्या मधोमध भलेमोठे खड्डे पडले असून हा रस्ता अक्षरशः खड्डयांच्या गर्तेत अडकल्याचे पहावयास मिळत आहे. या खड्डयांमुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. ठाण्यात पावसाची सुरुवात होताच रस्त्यांची दुरवस्था उघड होण्यास सुरुवात होते आणि यंदाही त्याला अपवाद राहिला नाही. यंदा अवकाळी पावसाने आधीच हजेरी लावल्याने रस्त्यांची दयनीय अवस्था लवकर उजेडात आल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

ठाणे शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करत असल्यामुळे ठाण्यात मोठमोठे टॉवर, मेट्रो, सुशोभीकरणाकडे राजकीय नेत्यांनी तसेच प्रशासनाने लक्ष केंद्रित झाले आहे. मात्र या सगळ्या देखाव्याच्या मागे ठाणेकरांच्या मूलभूत गरजांकडे विशेषतः रस्त्यांच्या दुरुस्तीच्या प्रश्नांकडे केवळ दुर्लक्षच होत आहे.

प्रत्येक पावसाळ्याच्या सुरुवातीला पालिका आणि नेते यंदा खड्डेमुक्त ठाणे होईल, असे आश्वासन देतात. मात्र प्रत्यक्षात पावसाळा संपेपर्यंतही रस्त्यांवरील खड्डे कायम राहतात. त्यामुळे या खड्डयांतून प्रवास करणे हे ठाणेकरांसाठी नेहमीचे झाले आहे. या खड्डयांची दुरुस्ती करताना तात्पुरता डांबर अथवा मास्टिकचा लेप लावून काम उरकले जाते.

प्रत्येक पावसाळ्याच्या सुरुवातीला यंदा ठाणेकरांचा प्रवास खड्डेमुक्त होणार अशी दिवास्वप्ने पालिका आणि नेते दाखवत असतात मात्र प्रत्यक्षात पूर्ण पावसाळा गेला तरी खड्डयातून प्रवाशांची सुटका काही केल्या होत नसल्याची खंत प्रत्येक जण व्यक्त करत असतो.

**कृतिशील पावले उचलण्याची गरज**

शहराच्या विकासासाठी सौंदर्यीकरण महत्त्वाचे असले तरी नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या रस्ते, पाणी, वाहतूक या मूलभूत सुविधा अधिक महत्त्वाच्या आहेत. प्रशासन आणि राजकीय नेत्यांनी केवळ बॅनरबाजी आणि घोषणा न करता खऱ्या अर्थाने ठाणेकरांच्या व्यथा समजून घेऊन त्या दूर करण्यासाठी कृतीशील पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा "खड्डेमुक्त ठाणे" ही घोषणा केवळ बोगस आश्वासन ठरून राहील.

# लोटस तलावातील भरावकाम अखेर बंद

## सिडको विरुद्ध मनपा आणि पर्यावरणप्रेमी यांच्यात वाद



■**नवी मुंबई** : पर्यावरणप्रेमी आणि लोकप्रतिनिधींच्या निषेध विरोधानंतर गुरुवारी अखेर लोटस तलावातील भरावाचे काम थांबवण्यात आले आहे. ठेकेदारांनी भराव करण्यासाठी आणलेले पोकलेन यंत्र तसेच इतर वाहने माघारी नेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मात्र दुसऱ्याच दिवशी या तलावात भराव टाकण्यासाठी सिडकोने नेरूळ पोलीस ठाण्याकडे संरक्षण मागितल्याचे पत्र दिवसभर समाज माध्यमातून फिरत असल्याचे दिसून आले.

मात्र याबाबत सिडकोच्या प्रतिनिधींनी मौन बाळगले असल्याचे दिसून येत आहे. नवी मुंबईतील नेरूळ सेक्टर २८ भूखंड क्रमांक २ येथील पाणथळ तलाव असून त्याला लोटस म्हणून ओळखले जाते. याच तलावात प्रचंड मोठ्या प्रमाणात भराव टाकण्यात येत होता.

या लोटस तलावात सिडकोने भराव टाकण्याची परवानगी मे. ठाकूर इन्फ्रा (टीआयपीएल) या ठेकेदार कंपनीला दिली होती. मागील दोन दिवस पर्यावरणप्रेमी, नागरिक, स्थानिक नगरसेवक यांच्या विरोधाला न जुमानता ठेकेदाराने भराव करण्याचे काम सुरू ठेवले होते. परंतु लोकप्रतिनिधी व पर्यावरणप्रेमी यांच्या विरोधामुळे अखेर भरावाचे काम थांबवले आहे. परंतु तरीदेखील टीआयपीएल कंपनीने लोटस तलावात जवळजवळ १०० डंपर भराव टाकला आहे.

उच्च न्यायालयाने लोटस संरक्षित पाणथळ तलावाचे संवर्धन करण्याचे आदेशित केलेले असताना लोटस तलाव बुजवण्याचा सिडकोचा प्रयत्न होता, परंतु तो सफल झाला नाही. लोटस तलाव संरक्षित करण्यासाठीचा अंतिम निर्णय झालेला नसल्याने या पाणथळ तलाव वाचवण्यासाठी सातत्याने आवाज उठवणार असल्याचा विश्वास नागरिकांनी व पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केला आहे.

**जमीन भूमाफियांच्या घशात घालण्याचा डाव**

या ठिकाणी भराव टाकण्यासाठी संरक्षण मागितल्याचे पत्र समाज माध्यमात फिरत असून असे पत्र आम्हाला प्राप्त झाले नसल्याची माहिती पोलिसांनी दिली तर याप्रकरणी अनेकदा प्रयत्न करूनही सिडको प्रतिनिधींशी संपर्क न झाल्याने प्रतिक्रिया मिळू शकली नाही. हा तलाव बुजवून सिडको भूमाफियांची मदत करीत आहे. जर भराव टाकला तर जमीन भूमाफियांच्या घशात घालण्याचा डाव सिडको अधिकाऱ्यांचा असल्याचा आरोप सिडकोवर होत आहेत.

# पुरोगामी कोल्हापूरमध्ये खळबळ! पंचगंगेच्या घाटावर रात्री ११ वाजता अघोरी प्रकार



दरम्यान, प्रत्यक्षदर्शी व्यक्तींनी काही सामाजिक कार्यकर्त्यांना बोलावून घेतलं. मांत्रिकाला जाब विचारण्यास गेल्यानंतर घाबरून मांत्रिक तेथून पळून गेला. मात्र या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियामध्ये व्हायरल झाल्यानंतर एकच खळबळ उडाली असून शाहूंच्या या नगरीत भोंदूगिरीला स्थान नाही. अशा भोंदूगिरी करणाऱ्या बाबांवर पोलिसांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी प्रत्यक्षदर्शी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केलीय.

■**कोल्हापूर** : झपाटलेल्या बाईच्या अंगातून मांत्रिकाकरवी भूत काढण्याचा अघोरी प्रकार कोल्हापुरात उघडकीस आलाय. कोल्हापुरातल्या पंचगंगा नदी घाटावर हा प्रकार घडला असून रात्रीच्या अंधारात पंचगंगा घाटावर मांत्रिकाकडून भूत काढण्याचा अघोरी प्रकार केला जात असल्याच व्हिडिओमध्ये दिसून येत आहे. हा सर्व प्रकार सोमवारी रात्री ९ ते ११ च्या दरम्यान घडल्याचं काही प्रत्यक्षदर्शीनी सांगितलय. याप्रकरणी अद्याप कोणावरही कारवाई झाली नसून थेट पंचगंगा घाटावर अशा प्रकारची घटना घडल्यामुळे संबंधित मांत्रिकावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आलीय.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कोल्हापूर नगरीत आजवर कधीच अंधश्रद्धेला स्थान मिळालं नाही. मात्र गेल्या काही दिवसात भोंदूगिरीचे अनेक प्रकार कोल्हापुरात घडत आहेत. या भोंदूगिरीला कोल्हापुरातील अनेक सर्वसामान्य नागरिक बळी पडत असून असाच एक प्रकार काल रात्री उघडकीस आलाय. पंचगंगा नदी घाटावर झपाटलेल्या असल्याच्या संशयावरून एका महिलेवर मांत्रिकाकडून भूत काढण्याचा अघोरी प्रकार सुरू असल्याच समोर आलाय. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार रात्री १० ते ११च्या दरम्यान घडल्याचं स्थानिक प्रत्यक्षदर्शी यांनी सांगितलय. हा प्रकार इतका भयानक होता की याचे व्हिडिओ सोशल मीडियामध्ये व्हायरल झाले असून एकच खळबळ उडालीय.

व्हायरल होत असलेल्या व्हिडिओ आणि प्रत्यक्षदर्शीनी सांगितलेल्या माहितीनुसार, कोल्हापुरातील पंचगंगा घाट येथे रात्री दहा ते अकराच्या दरम्यान पाच ते सहा पुरुष आणि एक महिला पंचगंगा घाट परिसरात आले. इतक्यात तथाकथित मांत्रिक घाटावर पोहोचला. सर्वजण घाटावर नदीकिनारी बसून जेवत असताना अचानक आरडाओरडा सुरू झाली. महिला झपाटलेली असल्याचा म्हणत त्या मांत्रिकाने तिला जोरजोरात ओरडायला लावलं, तिच्या अंगावर फुंकी मारली, काही विचित्र क्रिया केल्या. आरडाओरडा होत असल्याचं तिथेच बाजूला बसलेल्या काही नागरिकांना कानावर पडताच ते तेथे पोहोचले. त्यातील एका व्यक्तीने हा सर्व प्रकार मोबाईल मध्ये कैद केला.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com